## महाराष्ट्र राज्य सिंधी अकादमीमार्फत आयोजित कार्यक्रमाबाबतची नियमावली.

### १) लोकसाहित्य व सांस्कृतिक कार्यक्रमः

महाराष्ट्रात ज्या शहरांमध्ये सिंधी समाजाची मोठया प्रमाणात वस्ती आहे, अशा शहरांमध्ये सिंधी लोकसाहित्य, सिंधी संस्कृति, सिंधी भाषा व त्यातील गीते यापैकी एक अथवा अनेक प्रकाराच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल. प्रत्येक वर्षी ४ शहरांची अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निवड करण्यात येईल व तेथे लोकसाहित्य, चर्चासत्रे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. प्रत्येक कार्यक्रमासाठी रु.२.०० लाख इतक्या मर्यादे पर्यंत खर्च करण्यात येईल. अकादमींच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नांवे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन त्यांनतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

### २) प्रूफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळाः

सिंधी भाषा शुध्द स्वरुपामध्ये लिहिता-वाचता यावी, या उद्देशाने अकादमीमार्फत दरवर्षी प्रूफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. या कार्यक्रमाच्या आयोजनसाठी अकादमी साहित्यक्षेत्राशी संबंधित नोंदणीकृत संस्थेच्या साहाय्याने कार्यक्रमाचे आयोजन करील. नोंदणीकृत संस्थेची निवड ही अकादमीच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने करण्यात यावी. यासाठी कमाल रु.१.०० लाख इतका खर्च काण्यात यावा व या बाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करावे.

### ३) कवी संमेलनः

सिंधी भाषक किंवा सिंधी भाषेत काव्यलेखन करणाऱ्या कवीचे अकादमीची समिती निश्चित करेल, त्या दिनांकास कवीसंमेलन आयोजित करण्यात येईल. नवोदित कवींना त्यातून प्रोत्साहन मिळून त्यांच्या कडून उत्कृष्ठ काव्य निर्मिती होऊ शकेल.

### ४) सिंधी भाषा दिन व पुरस्कार प्रदानसोहळाः

दि. १० एप्रिल हा सिंधी भाषा दिन दरवर्षी साजरा केला जाईल. या प्रसंगी सिंधी भाषेतील विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातील. या प्रसंगी किंवा समिती निश्चित करेल त्या दिनांकास जीवन गौरव व अन्य पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

**५) सिंधी अकादमीचा अभ्यास दौराः**

ज्या राज्यांमध्ये सिंधी अकादमी आहे, त्यांचे कामकाज व उपक्रम पाहून आपल्या अकादमीसाठी त्याचा कसा उपयोग होऊ शकेल, याचा आढावा घेण्यासाठी अकादमीच्या ४ ते ५ समिती सदस्यांचा समावेश असलेल्या अभ्यास गटास त्या राज्यामध्ये दौऱ्याचे आयोजन करता येईल. तथापि, यासाठी शासनाची पूर्वी संमत्ती घेणे आवश्यक राहील.